सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

नागपूर विभाग शासकीय तंत्रनिकेतन परिसर,सदर,नागपूर

दुरध्वनी क्रमांक : २५६५१४३ फॅक्स क्रमांक : ०७१२-२५६१६६३

E-mail:ronagpur.dte@gmail.com Website:www.rdtenagpur.org.in

क्रमांक:तंशिसं/विकाना/आस्था/२०१२/179

दिनांक: 18/01/2012

सुचना

विषय :- शासकीय अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयातील तसेच शासकीय तंत्रनिकेतनातील वस्त्रनिर्माण व इंग्रजी या अभ्यासक्रमाच्या अध्यापकांची रिक्त पदे कंत्राटी स्वरुपात भरण्याबाबत/मुलाखतीबाबत.

शासकीय अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयातील तसेच शासकीय तंत्रनिकेतनातील वस्त्रनिर्माण व इंग्रजी या अभ्यासक्रमाच्या कंत्राटी अधिव्याख्याता या पदांसाठी शासकीय तंत्रनिकेतन, नागपुर येथे लेखी परीक्षा व सादरीकरण दिलेल्या उमेदवारांना सुचित करण्यात येते की, सदरहु उमेदवारांची लेखी परीक्षा व सादरीकरण झाल्यानंतर मुलाखत लगेच घ्यावयाची होती, परंतु महाराष्ट्र राज्यात जिल्हा परीषद सार्वत्रीक निवडणुका - २०१२ निवडणुकीचा कार्यक्रम दिनांक ०३/०१/२०१२ रोजी जाहीर झाल्यामुळे सदरहु दिनांकापासुन आचारसंहिता अंमलात आलेली आहे. त्यामुळे आचारसंहितेच्या कालावधीत मुलाखती घेता येत नाहीत. मुलाखती घेण्याची परवानगी मा. निवडणुक आयुक्त यांना मागितलेली असुन परवानगी मिळाल्यास मुलाखतीचे आयोजन करता येईल अन्यथा मुलाखतीचे आयोजन आचारसंहिता संपल्यानंतर केल्या जाईल, तसेच मुलाखतीचा कार्यक्रम या कार्यालयाच्या व संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केल्या जाईल. यांची संबधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नागपूर

प्रत :-

१. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर यांना माहितीकरीता.
२. श्री. पी.टी. नगराळे, प्रोग्रामर, हेच कार्यालय, यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता. त्यांनी सदरहु सुचना कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.
३. सुचना फलक, हेच कार्यालय